सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक एसपीपी-०१२५/ प्र. क्र.२५/पोल-१० दि.१०/०९/२०२५.

**विषय** :- श्री. राजा ठाकरे, एएसजी, विशेष समुपदेशी यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.. कराड शहर पो.ठा.गु.र.क्र. १९/२००९ या गुन्हयातून मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल SLP (Crl) Diary No. 1798/2025 या प्रकरणातील कामकाजाकरिता.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-एसपीपी-०१२५/प्र.क्र.२५/पोल-१०, दि.१०/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१०१८३४५४०१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 12-09-2025 18:04:13

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**श्री.राजा ठाकरे, एएसजी, विशेष समुपदेशी यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत....**
**कराड शहर पो.ठा.गु.र.क्र.१९/२००९ या गुन्ह्यातून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल SLP (Crl.) Diary No.1798/2025 या प्रकरणातील कामकाजाकरिता.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :-एसपीपी-०१२५/प्र.क्र.२५/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
२ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १० सप्टेंबर, २०२५.

**संदर्भ:-** (१) पोलीस महासंचालक,म.रा. यांचे पत्र क्र.पोमंस/१४/६६/वि.स.अ./क्रि.रि.पि.१७९८-२०२५/२०२५, दि.२१.०१.२०२५.
(२) विधि व न्याय विभाग, शासन पत्र क्र.युओआर-११/२०२५/डेस्क-१४, दि.०५.०२.२०२५.
(३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम, दि.२९.०७.२०१५.
(४) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम, दि.१६.०६.२०१७.
(५) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.मिटींग-जीपीएच-२०२३/सी.आर.२९/डी-१४, दि.३०.१०.२०२३.

**शासन निर्णय :-**

कराड शहर पो.ठा.गु.र.क्र.१९/२००९ या गुन्ह्यातून मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल **SLP (Crl.) D.No.1798/2025** या प्रकरणातील न्यायालयीन कामकाज शासनाच्या वतीने पाहण्यासाठी श्री.राजा ठाकरे, ॲडीशनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया यांची 'विशेष समुपदेशी' म्हणून संदर्भाधिन क्र.२ येथील विधि व न्याय विभाग, शासन अधिसूचना दि.०५.०२.२०२५ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी काम पाहण्यासाठी श्री.राजा ठाकरे, एएसजी यांना खालीलप्रमाणे व्यावसायिक फी मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील कामकाजाकरिता :-**

**प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी - रू. ५,५०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख पन्नास हजार फक्त)**

सदर फी व्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ श्री.राजा ठाकरे, ए.एस.जी. यांना अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही अपरिणामकारक सुनावणीकरिता फीचे प्रदान करण्यात येणार नाही.

२. संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दि.३०.१०.२०२३ अन्वये सरकारी वकील यांचे शुल्क/भत्ते निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये परिणामकारक सुनावणी बाबत तरतूद नमूद करण्यात आली असून त्यानुसार परिणामकारक सुनावणीची गणना करण्यात यावी.

३. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधित प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून तसेच संबंधित मा. न्यायालयाच्या प्रबंधकाकडून तपासून, प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता संबंधित पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक यांनी घ्यावी.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या "मागणी क्रमांक बी-१, २०५५ पोलीस -(००)१०९, जिल्हा पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८)- २८ व्यावसायिक सेवा" या लेखाशीर्षाखालील त्या-त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधीन आणि मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा.

**५.** प्रस्तुत शासन निर्णय संदर्भ क्र. २ व ३ वरील वित्त विभाग, शासन निर्णयानुसार मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायालयीन प्रकरणी नेमण्यात आलेल्या विशेष सरकारी अभियोक्त्यांना फी अदा करण्यासंदर्भात प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्र. २०२५०९१०१८३४५४०१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHURI TANAJI KUMBHAR

Digitally signed by MADHURI TANAJI KUMBHAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1650798e0c9931a9480482b5a9883c597c9e78d49d032fb153c34fcc1246c, postalCode=415539, street=2061 Narayan Mandirachya Najikcha bhag Belavade Bk Belawade Budruk Tal Karad, pseudonym=71a2d29132ba4e27ad897e4d0d4f8802, title=0316, serialNumber=e86b6efe0519c15a1cc583c9cc0827ae71a1a00991463b4f4488302407860773, o=Personal, cn=MADHURI TANAJI KUMBHAR
Date: 2025.09.10 18:36:42 +05'30'

**(माधुरी कुंभार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
३) पोलीस अधीक्षक, सातारा.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई- १, महाराष्ट्र राज्य.
५) कोषागार अधिकारी, सातारा.
६) श्री.राजा ठाकरे , अॅडीशनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया, एसई-१२५, लॉ ऑफिसर्स चेंबर्स, सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
७) कार्यासन अधिकारी (का-१४), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) कार्यासन अधिकारी (७-व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (पोल-१०)